पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८, कामगार कल्याण विभाग
जा. क्र. काक/३/कावि/०७/२०२३
दिनांक :- ०३/०१/२०२३

प्रति,
मा. सर्व विभागप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

विषय :- कंत्राटी कामगाराचे किमान वेतन दराबाबत....
संदर्भ :- १) मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/९४/२०२० दि. १२/०२/२०२०
२) मा. कामगार उप आयुक्त(ग्रा.वि.), मुंबई व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम १९४८ यांचेकडील क्र.ग्रा.वि./कि.वे.अ/वि.भ/२०२३(१)/कार्या-१०/ दि.०१/०२/२०२३ रोजीने भत्त्याचे निर्धारित केलेल दर.

महोदय,

मा. आयुक्त सो यांचेकडील उक्त संदर्भीय क्र. १ चे आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या कामगाराचे तसेच महानगरपालिकेसाठी सेवा देणा-या कंत्राटी कामगारामार्फत नेमणेत आलेल्या कंत्राटी कामगाराचे दिनांक ०१/०१/२०२० पासूनचे किमान वेतनाचे दर निश्चित आले आहे. सदर आदेशामध्ये दर सहा महिन्याकरिता प्रसिद्ध होणा-या विशेष भत्त्याने दर कामगार कल्याण विभागाने महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावे व त्याचप्रमाणे संबंधित विभागांनी किमान वेतनदराची अदायगी करण्यात यावी असे नमूद केले आहे. उक्त संदर्भीय क्र. २ अन्वये दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३०/०६/२०२३ या कालावधीतील विशेष भत्त्याचे दर प्राप्त झाले आहेत. सदरचे दर माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविणेत येत आहे.

आपला विश्वासू,

(प्रमोद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

Scanned with OKEN Scanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

कामगार कल्याण विभाग

कुशल/अर्धकुशल/ कुशल कामगारांचे वेतन दर खालीलप्रमाणे

(कालावधी – दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३०/०६/२०२३)

मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/९४/२०२० दिनांक १२/०२/२०२० मध्ये नमूद केलेल्या अति व शर्तीस अधीन राहून.

जा. क्र. काक/३/कावि/०८ /२०२३ दिनांक.०३/०२/२०२३

| अ.क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन र.रु (१) | विशेष भत्ता र.रु. (२) | एकूण वेतन र.रु |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | १४,०००.०० | ७५२५.०० | २१५२५.०० |
| २ | अर्धकुशल कामगार | १३,०००.०० | ७५२५.०० | २०५२५.०० |
| ३ | अकुशल कामगार | ११,५००.०० | ७५२५.०० | १९०२५.०० |

कंत्राटी कामगारांना मूळ वेतन + विशेष भत्ता या एकत्रित रक्कमेवर खालील प्रमाणे भत्ते देय राहतील.

| अ.क्र. | तपशील | मालकाचा हिस्सा |
|---|---|---|
| १ | घरभाडे (१+२ यावर) | ५ % |
| २ | ई.पी.एफ.<br>( एकुण वेतन र.रु १५,०००/- पर्यनच देय) | १३% |
| ३ | बोनस ( १+२ यावर ) | ८.३३ % |
| ४ | रजा वेतन ( १+२ यावर) | ५.७७% |
| ५ | कामगार कल्याण निधी (दर महा) | र.रु. ६/- |
| ६ | सेवाशुल्क (१+२ यावर) अथवा निविदा स्विकृतीचे दराप्रमाणे | ५ % |

वरील प्रमाणे मनपातील सर्व कंत्राटी कामगारांना वेतन अदा करणे आवश्यक आहे.

(प्रमोद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

Scanned with OKEN Scanner